लोकमत

# सैन्यदलामध्ये महिलांना संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** हुतात्मा राजगुरु विद्यालय ज्युनिअर कॉलेजमधील अकरावी बारावी विद्याथीर्नीसाठी अजय शिर्के ,स्मिता आपटे यांनी कार्यक्रम आयोजित केला होता. प्रमुख वक्त्या कॅप्टन तनुजा काब्रे, अध्यक्ष प्राचार्य शंकर शेटे होते.

तनुजा काब्रे यांनी विद्यार्थिनी मध्ये नेतृत्व, धाडसीपणा, समय सुचकता, योग्य निर्णय घेण्याची क्षमता असली पाहिजे. अपयशाने कधीही खचून न जाता यश मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. स्वत:च्या उदाहरणाद्वारे पटवून दिले. सैन्य दलातील अनुभव सांगितले.

विद्यार्थिनींनी ध्येय ठरवून प्रयत्न करावेत, देशभक्तीची उदाहरणे दिली व्हिडिओ दाखवला. काही विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सैन्य दलात भरती होण्यासाठी प्रयत्न करु इच्छा व्यक्त केली. प्राचार्य शंकर शेटे यांनी विद्यार्थिनींनी माहिती घ्यावी व यातून आपले करियर निवडावे, असे सांगितले. या कार्यक्रमास स्मिता आपटे, मैथिली बंडी, कौस्तुभ जोगळेकर, प्रा. विठ्ठल सूळ, अनिता शेळके व इतर सेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन शारदा शेटे यांनी केले.



मार्गदर्शन शिबिराच्या प्रसंगी विद्यार्थी मार्गदर्शक व शिक्षक.